रात्री ईयरफोन लावून झोपणे धोकादायक

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : रात्री शांत झोप लागण्यासाठी अनेक जण ईयरबड्स, नेकबँड किंवा हेडफोन लावून संगीत आणि पॉडकास्ट ऐकणे पसंत करतात. हळूहळू ही एक सवय बनते आणि ईयरबड्सशिवाय झोपच येत नाही. ही सवय वरकरणी आरामदायी वाटत असली, तरी ती कान आणि मेंदूच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

आसपासचा आवाज कमी करणे किंवा ताणतणाव दूर करणे या कारणांसाठी लोक रात्री ईयरफोनचा वापर करतात. रात्रभर ईयरबड्स लावून झोपल्याने मेंदू आणि कानांवर परिणाम होतात. सतत चालणाऱ्या ऑडिओमुळे मेंदू पूर्णपणे रेस्ट मोडमध्ये जाऊ शकत नाही, ज्यामुळे झोपेच्या नैसर्गिक चक्रात अडथळा निर्माण होतो. परिणामी, दुसऱ्या दिवशी थकवा, लक्ष केंद्रित न होणे आणि चिडचिड यांसारख्या समस्या जाणवतात.

याशिवाय कानांना प्रत्यक्ष शारीरिक हानी पोहोचते. ईयरबड्समुळे कानातील हवेचा प्रवाह रोखला जाऊन ओलावा साचतो, ज्यामुळे इन्फेक्शन, खाज आणि त्वचेचा दाह वाढतो. तसेच, कानातील कान बंद होणे, दुखणे, घंटीसारखा आवाज येणे आणि तात्पुरते कमी ऐकू येणे अशा समस्या उद्भवतात. त्यामुळे अधूनमधून कमी आवाजात ऑडिओ ऐकणे ठीक असले, तरी रात्रभर ईयरबड्स लावून झोपणे आरोग्यासाठी धोके निर्माण करू शकते, असे तज्ज्ञांनी सांगितले.

राज्यात बेसॉल्ट दगडाची टंचाई

कुंभमेळ्याच्या कामांमुळे मागणीत वाढ; दरही वाढले

अनिकेत साठे, लोकसत्ता

नाशिक : कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील प्राचीन मंदिरे, घाट आणि कुंडांच्या पुनरुज्जीवनाची कामे एकाचवेळी सुरू असल्याने बेसॉल्ट दगडाची टंचाई जाणवू लागली आहे. या दगडाची मागणी वाढल्याने दरही उंचावले आहेत. नेवासा येथील खाणी बंद असल्याने हा दगड नांदेडच्या देगलूरहून आणावा लागत आहे. काहींनी थेट राजस्थानातील मोठ्या आकाराच्या बेसॉल्ट दगडाला पसंती दिली आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश प्राचीन मंदिरे अतिशय मजबूत आणि टिकाऊ असणाऱ्या बेसॉल्ट दगडात बांधलेली आहेत. कुंभमेळ्यानिमित्त राज्य पुरातत्व विभाग नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील १६ प्राचीन मंदिरे व घाटांचा कायाकल्प करीत आहे. सुमारे ५६ कोटी रुपयांच्या या कामांमध्ये मुख्य घटक असलेल्या बेसॉल्ट दगडांचा तुटवडा भासत आहे.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या गोदा काठावरील नारोशंकर मंदिराचे काम प्रगतीपथावर आहे. (छाया - यतीश भानू)

> नारोशंकर मंदिर, त्र्यंबकेश्वर येथील प्रयागतीर्थ, बिल्वतीर्थ, इंद्रकुंड आणि मुकुंद या ठिकाणच्या कामांसाठीही बेसॉल्ट दगडांची आवश्यकता आहे. अचानक वाढलेली मागणी आणि पुरवठादारांची कमतरता यामुळे बेसॉल्ट दगड वेळेवर उपलब्ध होत नाही. पावसाळ्यात खाणींमध्ये पाणी साचल्यामुळे दगड काढण्यात अडचणी येत असल्याचे ठेकेदारांकडून सांगितले जाते. **- अमोल गोटे,** उपसंचालक, राज्य पुरातत्व विभाग, नाशिक

भीमाशंकर मंदिराचे काम करणारे 'सवाणी हेरिटेज' सध्या तुळजापूर व पंढरपूर मंदिरांबरोबरच नाशिकमधील नारोशंकर मंदिर आणि त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तीर्थाचेही काम करीत आहे. या कंपनीचे संचालक राम सवानी यांनी सांगितले की बेसॉल्ट दगडाच्या मागणीत प्रचंड वाढ झाली आहे. या कामांसाठी राजस्थानमधून दगड मागवावे लागत आहेत. राजस्थानमधील बेसॉल्ट दगड त्यापेक्षा मजबूत, भरीव आणि खांबाच्या स्वरूपात असतो. मोठ्या रचनांसाठी राजस्थानहून दगड आणणे आवश्यक ठरते, असे त्यांचे म्हणणे आहे.

नेवासा येथील खाणीतून पूर्वी बेसॉल्ट दगड उपलब्ध होत असे. दोन वर्षांपासून तेथील खाणी बंद आहेत. स्थानिक पातळीवर कठीण बेसॉल्ट उपलब्ध नसल्याने नांदेडच्या देगलूरचा दगड अधिक वाहतूक खर्च करून येथे आणावा लागतो, असे मंदिर जीर्णोद्धाराचे काम करणारे अक्षय गुत्ते यांनी सांगितले. देगलूरचा दगड अत्यंत कडक बेसॉल्ट असून त्यावर घडाई करण्यासही वेळ लागतो. या कामात हवामानाचेही आव्हान आहे. सिमेंटचे काम सहा तासांत स्थिर होते. दगडी बांधकामातील चुना स्थिर होण्यासाठी किमान ४८ तास लागतात. त्र्यंबकेश्वरच्या वातावरणात एका थरानंतर दुसऱ्या थराचे काम करण्यासाठी वाट पाहावी लागते, असेही गुत्ते यांनी नमूद केले.

दगडाचे दर किती?

- देगलूरचा अनघड दगड एक बाय दीड, दीड बाय दोन फूट आकारात मिळतो. एक बाय दीड फूट आकाराचा दगड सध्या १३० ते १४० रुपये प्रतिनग या दराने मिळतात.
- राजस्थानातील बेसॉल्ट दगड चौकोनी आणि कापलेल्या स्वरूपात मिळतो, जो बसविण्यास सोपा असतो. तो आणण्यासाठी एका मालमोटारीचा वाहतूक खर्च सव्वालाख रुपये आहे.
- राजस्थानच्या दगडाचे दर आकार व कोरीव कामावर अवलंबून असतात. १०० ते २०० रुपये रनिंग फूट दराने तो मिळतो. भीमाशंकर मंदिराच्या कामावेळी मालासह एका मालमोटारीला साडेतीन लाख रुपये खर्च आल्याचे सांगितले जाते.

ग्रामसभेत प्रश्न विचारणाऱ्या तरुणाला बेदम मारहाण

जळगावच्या पाचोरा तालुक्यातील घटना, माजी सरपंचाचे कृत्य

लोकसत्ता प्रतिनिधी

जळगाव : जिल्ह्यातील जारगाव (पाचोरा) येथे महात्मा गांधी जयंती दिनी आयोजित विशेष ग्रामसभेत गावामध्ये डास प्रतिबंधक धूर फवारणी यंत्राचा वापर का केला जात नाही, असा प्रश्न प्रशासकांना विचारणाऱ्या आनंद पाटील या तरुणाला माजी सरपंचासह इतरांनी बेदम मारहाण केल्याची चित्रफीत समाजमाध्यमावर प्रसारित झाली आहे. या प्रकरणी पाचोरा पोलिसांनी दोन तरुणांवर शनिवारी प्रतिबंधात्मक कारवाई केली.

गांधी जयंती निमित्ताने जारगाव येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत विविध विकासकामे, नागरी सुविधा तसेच सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा सुरू असताना, आनंद पाटील या तरुणाने गावात डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे सांगत धूर फवारणी यंत्राचा वापर का होत नाही, असा प्रश्न उपस्थित केला. यावरून माजी सरपंच सुनील पाटील आणि आनंद पाटील यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक उडाली. या वादाचे रूपांतर नंतर हाणामारीत झाले. या प्रकरणी पीडित तरुण आनंद पाटील याने माजी सरपंच सुनील पाटील यांच्यासह तिघांविरुद्ध पाचोरा पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला. त्यानुसार, पोलिसांनी शनिवारी मारहाण प्रकरणाचील दोन तरुणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. माजी सरपंच बाहेरगावी असल्याने त्यांच्यावर मात्र कोणतीच कारवाई होऊ शकली नाही. पोलीस या प्रकरणाची अधिक चौकशी करत आहेत.

दरम्यान, माजी सरपंच सुनील पाटील यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले. आनंद पाटील याच्याकडे ग्रामपंचायतीची ३६ हजार रुपयांची घरपट्टी थकीत आहे, तसेच तो त्याच्या घराचे सांडपाणी आपल्या भूखंडावर सोडत असल्याने परिसरातील नागरिकांना त्रास होत आहे, असा उलट आरोप त्यांनी केला. मावळते सरपंच हे शिवसेनेच्या शिंदे गटाचे पदाधिकारी असल्याने या घटनेला राजकीय किनार आहे का, अशीही चर्चा गावात रंगली आहे.

विजेची मागणी ३० हजार मेगावॅटवर

चंद्रपूरचे दोन संच बंद, यंत्रणेवर ताण

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : राज्यातील विजेची मागणी शनिवारी दुपारी २.३० वाजता ३०,३५९ मेगावॅटवर पोहोचली. वाढत्या तापमानामुळे आणि कृषिपंपांच्या वापरात वाढ झाल्याने विजेची मागणी वाढत असतानाच महानिर्मितीच्या चंद्रपूर औष्णिक वीज प्रकल्पातील दोन संच तांत्रिक कारणांमुळे बंद पडले आहेत. नाशिक आणि खापरखेड्यातील बंद संच सुरू झाले असले, तरी कोराडीतील एक संच देखभाल-दुरुस्तीसाठी अद्याप बंद आहे.

राज्यात पावसाने उघडीप दिल्याने तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे वातानुकूलित यंत्रांसह अन्य विद्युत उपकरणांचा वापर वाढला आहे. कमी पावसामुळे अनेक भागांत निर्माण झालेल्या दुष्काळी स्थितीमुळे कृषिपंपांचाही वापर वाढला आहे. परिणामी, १ ऑक्टोबरला २८ हजार ६५ मेगावॅट असलेली विजेची मागणी दोन दिवसांत ३० हजार ३५९ मेगावॅटवर पोहोचली. शनिवारी मागणीच्या तुलनेत राज्यात १८ हजार ३८६ मेगावॅट वीजनिर्मिती होत होती, तर केंद्राच्या वाट्यातून ११ हजार ९७३ मेगावॅट वीज उपलब्ध झाली.

७ हजार ४३ मेगावॅट वीजनिर्मिती

- महानिर्मितीकडून शनिवारी ७ हजार ४३ मेगावॅट वीज उपलब्ध झाली. त्यात औष्णिक प्रकल्पांचा वाटा ६ हजार ३२३ मेगावॅट, उरण गॅस प्रकल्पाचा ११६ मेगावॅट, सौर ऊर्जा प्रकल्पांचा २२७ मेगावॅट आणि जलविद्युत प्रकल्पांचा ३७३ मेगावॅट होता.
- खासगी प्रकल्पांमधून जिंदल १ हजार ६१, अदानी २ हजार ४४२, आयडियल २३१, रतन इंडिया १ हजार ३१०, बुटीबोरी आरईएल ४९९, एसडब्ल्यूपीजीएल ४५९ आणि जिंदल पॉवर १२१ मेगावॅट वीज उपलब्ध होत होती.

धुळ्यात विवाहितेवर सामूहिक अत्याचार

धुळे : विवाहितेवर अत्याचार करून, चित्रफीत प्रसारित करण्याची धमकी देत खंडणी उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आझादनगर पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. साहिल हबीब पिंजारी, बाबू इरफान शाह आणि समद शेख जब्बार अशी तिघा संशयितांची नावे आहेत. शनिवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास संशयितांनी पीडितेच्या घरात जबरदस्तीने प्रवेश करून लैंगिक अत्याचार केल्याचा, तसेच ७०० रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

हिंगोली जिल्ह्यात सहा महिन्यात भूकंपाचे ३० धक्के

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : जिल्ह्यात शनिवारी वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे येथे सकाळी ४.५, तर औंढा नागनाथ तालुक्यातील गडाळा येथे ३.३ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. वारंवार होणाऱ्या भूकंपामुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. गेल्या सहा महिन्यांत ३० पेक्षा अधिक भूकंप नोंदविण्यात आले आहेत.

वसमत, हिंगोली, कळमनुरी आणि औंढा नागनाथ या चार तालुक्यांत गेल्या सहा वर्षांत सुमारे ३० सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. यातील चार धक्क्यांची तीव्रता ४.४ ते ४.७ रिश्टर स्केल एवढी होती. काही महिन्यांपूर्वी पांगरा शिंदे परिसरात ४.७ तीव्रतेच्या धक्क्यानंतर अवघ्या काही तासांत ३.६, ३.९ आणि ४.१ तीव्रतेचे धक्के नोंदविण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने वैज्ञानिक भूकंप सज्जता आराखडा तयार करण्याची घोषणा केली होती. मात्र, या घोषणांनंतर प्रत्यक्षात किती काम झाले, याची माहिती ग्रामस्थांना उपलब्ध नाही.

दरम्यान, शनिवारी झालेल्या भूकंपात जीवितहानी किंवा नुकसान झाले नसल्याचे उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी स्पष्ट केले. अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे व औंढा नागनाथ तालुक्यातील गडाला येथे प्रत्येकी एक असे दोन भूकंपाचे धक्के बसले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

'मल्याचे बँकांना अद्यापही ८,७५१ कोटींचे देणे बाकी'

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : फरारी आर्थिक गुन्हेगार व उद्योगपती विजय मल्या याने बँकांच्या समूहाला अजूनही ८,७५१ कोटी रुपयांहून अधिक रक्कम देणे बाकी आहे, अशी माहिती स्टेट बँक ऑफ इंडियाने (एसबीआय) नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे दिली. तसेच, 'किंगफिशर एअरलाईन्स' प्रकरणाशी संबंधित मालमत्ता जप्त करण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या मल्याच्या याचिकेलाही विरोध केला.

'एसबीआय'ने या प्रकरणी नुकतेच एक प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यानुसार, ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत कायदेशीर आणि इतर खर्च वगळून मल्याने बँकांना एकूण ८,७५१.८६ कोटी रुपये देणे बाकी होते. वसुलीची प्रक्रिया सुरू असून त्याच्याकडून अद्यापही मोठी रक्कम वसूल होणे बाकी आहे, असेही 'एसबीआय'ने न्यायालयाला सांगितले. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीने केलेला अर्ज मंजूर करून विशेष सत्र न्यायालयाने मल्याची मालमत्ता जप्त करण्याचा आदेश डिसेंबर २०१९ मध्ये दिला होता. या निर्णयाला मल्या याने उच्च न्यायालयात आव्हान दिले असून त्यावर 'एसबीआय'ने प्रतिज्ञापत्र दाखल करून ही माहिती दिली.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

मालेगांव अंचल कार्यालय

बी.एस.एन.एल. संचार सदन, सटाणा नाक्याजवळ मालेगाव 423203
प्रधान कार्यालय: लोकमंगल 1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.

स्थावर मालमत्ताच्या विक्री करिता विक्री सूचना

दि सेक्यूरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रकशन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट्स अ‍ॅक्ट 2002 आणि त्यासह वाचण्याच्या सेक्युरिटी इंटरेस्ट्स (एन्फ़ार्समेंट) रुल्स 2002 मधील रूल 8(6) च्या अटींनुसार स्थावर मालमत्ताच्या विक्री करिता ई- ऑक्शन विक्री सूचना

या ठिकाणी सर्व साधारण जनतेस आणि विशेष करून कर्जदार आणि जामिनदाराना सूचना देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या सुरक्षित धनको (सिक्युर्ड क्रेडिटर) बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या कडे गहाण / बोज्या अंतर्गत आहेत आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी यानी सदर मालमत्तांचा **प्रत्यक्ष/ सांकेतिक ताबा** घेतला असून, सदर मालमत्तांची विक्री **दि. 21/10/2026 रोजी 01.00 ते 05.00 दरम्यान "जसे आहे जेथे आहे", जे आहे जसे आहे, "तेथे जे आहे"**, या तत्वावर बँक ऑफ महाराष्ट्र यांना खाली नमूद केलेल्या परिशिष्टामधील कर्जदार व जामीनदार यांच्या कडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी ई – ऑक्शनद्वारे केली जाणार आहे कर्जदार आणि जामिनदारांकडून येणे असलेल्या रकमेचा तपशील, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावरील माहिती असलेला बोज़ा, ताब्याचा प्रकार, राखीव किमत, बयाणा रक्कम पुढील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	कर्जदाराचे / जामीनदारांचे नाव	येणे रक्कम	स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि माहीत असलेला बोज़ा	राखीव किमत / बयाणा रक्कम / बोली वाढविण्याची रक्कम (सर्व तीन कर्जदार खात्यांची एकत्रित रक्कम)
1.	मेसर्स पी. स्क्वेअर क्रिएशन्स त्यांच्या द्वारे भागीदार 1. श्री.हेमंत प्रभाकर पाटील 2. श्री.भारत विश्वासराव पाटील 3. श्री जयंतीलाल देवाशी पटेल 4. श्री. हसमुख देवाशी पटेल शाखा - मालेगाव (नाशिक)	रु. 80,88,358/- 02/04/2025 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क रु. 33,27,277/- 01/08/2026 पर्यंत अधिक लागु न झालेले व्याज, कायदेशिर आणि इतर खर्च/ शुल्क	नोंदणीकृत गहाण असलेले संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले **प्लॉट नं. 7**, क्षेत्रफळ 504.00 चौ.मी. आणि प्लॉट नं. 8, क्षेत्रफळ एरीया 504 चौ.मी. आणि प्लॉट नं. 16, क्षेत्रफळ एरीया 514.03 चौ.मी. ज्यापैकी असलेले जी.नं. 1542/2ए/1 + 1542/2बी आणि त्यावरील बांधकामासह दाभाडी, मालेगाव. **प्लॉट नं. 16 ची चर्तुसिमा : पूर्व** - अतिरिक्त एस नं., **पश्चिम** - 15 मीटर रोड, **उत्तर** - प्लॉट नं. 15, **दक्षिण** - प्लॉट नं. 17. **प्लॉट नं. 7 + 8 ची चर्तुसिमा : पूर्व** - रोड, **पश्चिम** - रोड, **उत्तर** - खुली जागा, **दक्षिण** - सुविधा प्लॉट नं. 18. **ताब्याचा प्रकार : सांकेतिक ताबा.**	रु. 1,18,66,000/- (रुपये एक कोटी अठरा लाख सहासष्ट हजार फक्त) रु. 11,86,600/- (रुपये अकरा लाख शहाऐंशी हजार सहाशे फक्त) रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त)
2.	श्री बळीराम रामदास कलवार जमानतदार : 1. श्री. दिनेश सुभाष सांगळे 2. श्री योगेश अशोक सांगळे शाखा - मनमाड	रु. 9,53,566/- 21/01/2023 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क	**संपत्तीचे मालक : श्री. बळीराम रामदास कलवार** नोंदणीकृत गहाण असलेली संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले संपत्ती समावेश रो हाऊस नं. 07, क्षेत्रफळ 48 चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळ एरीया 515 चौ.फुट "साई रेसिडेंन्सी" नावानी परिचीत प्लॉट नं. 8 वरील बांधकामासह स्थित सर्व्हे नं. 142/ए1/ए5, कॅम्प एरीया मनमाड जवळ, क्षेत्रफळ 65.50 चौ.मी. पोस्ट मनमाड, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक. **चर्तुसिमा : (पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण) : पूर्व** - रो हाऊस नं. 06, **पश्चिम** - रो हाऊस नं. 08, **उत्तर** - रोड, **दक्षिण** - प्लॉट नं. 7 आणि 8. **ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष ताबा.**	रु. 9,80,000/- (रुपये नऊ लाख ऐंशी हजार फक्त) रु. 98,000/- (रुपये अठ्ठ्याण्णव हजार फक्त) रु. 20,000/- (रुपये वीस हजार फक्त)
3.	मेसर्स ए. के. ट्रेडर्स त्यांच्या द्वारा प्रोप्रायटर : श्री. रईस अहमद मोहम्मद आरिफ जमानतदार : श्री. मोहम्मद शहजाद मोहम्मद आरिफ (शाखा : मालेगाव (नाशिक)	रु. 3,07,85,732/- 06/01/2026 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क	**मालमत्ता धारकाचे नाव : श्री. रईस अहमद मोहम्मद आरिफ** नोंदणीकृत गहाण असलेले संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले जमिन आणि बिल्डींग स्थित सीटीएस नं. 1394/3, इस्लामपुर येथे तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक, प्लॉटचा क्षेत्रफळ एरीया 122.68 चौ.मी. **चर्तुसिमा : पूर्व** : सीटीएस नं. 1394/3 भाग, **पश्चिम** : सीटीएस नं. 1394/2, **उत्तर** : रोड, **दक्षिण** : गल्ली. CERSAI ID : 07AAECC5770G1ZN | Asset ID: 200063158382 **ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष ताबा**	रु. 1,00,90,000/- (रुपये एक कोटी नव्वद हजार फक्त) रु. 10,09,000/- (रुपये दहा लाख नऊ हजार फक्त) रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त)

ई-लिलाव तारीख 21/10/2026, दुपारी 01.00 ते सायं. 05.00 वाजेपर्यंत
मालमत्तेच्या पहाणीची तारीख व वेळ : दिनांक 05/10/2026 ते 19/10/2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 दरम्यान.
बयाना रक्कम आणि प्रूफ सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : दिनांक 20/10/2026 रोजी सायं 5.00 पर्यंत.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया बँके च्या वेबसाइट वरिल लिंक - https://bankofmaharashtra.bank.in तसेच पिएसबी अलायंस ई-बिक्रय https://baanknet.com/eauction-psb/x-login वर देखील प्रदान केले आहे किंवा यांच्याशी संपर्क साधवा श्री. अनस अली, मोबाइल नं. 9718617198, श्री. चेतन कापडणीस, मोबाईल नं. 8956495433 आणि श्री. ज्ञानेश्वर धडाडे, मुख्य व्यवस्थापक, मोबाइल नं. 8459141304

स्थान : मालेगाव
दिनाक : 03/10/2026
(सदर नोटीस ही मूळ इंग्रजी नोटिसचे भाषांतर असून, अर्थाच्या सोयीकरीता इंग्रजी भाषेतील नोटीस ग्राह्य धरली जाईल)
अधिकृत अधिकारी / मुख्य व्यवस्थापक
बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव झोन